दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

## संपकरी वीज कर्मचाऱ्यांवर 'मेस्मा'; राज्य सरकारची मोठी कारवाई

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संप मागे घेण्याचं आवाहन करूनही वीज कर्मचारी संघटनेकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने राज्य सरकारनं या संपकरी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. वीज कर्मचाऱ्यांसोबत मंगळवारी मंत्रालयात होणारी बैठकही रद्द करण्याचा निर्णय ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी घेतला आहे. त्यामुळे आता कर्मचाऱ्यांवर मेस्मा अंतर्गत कारवाई करणार असं सांगण्यात येत आहे. वीज मंडळाच्या कुठल्याही कंपनीचे खासगीकरण केले जाणार नाही. वीज कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करून तोडगा काढला जाईल,अशी ग्वाही वीज कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करताना ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी दिली होती. त्यासाठी मंगळवारी दुपारी ३ वाजता मंत्रालयात बैठकीचं आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

# ३१ मार्च २०२२ पर्यंत

# मालमत्ता कर भरा

---

# ५% सुट मिळवा

---

## ऑनलाइन भरल्यास २% अतिरिक्त सुट

## व

## १ एप्रिल २०२२ पासुन लागणारी शास्ती टाळा

---

# शेवटचे 3 दिवस

जनहितार्थ प्रकाशित

# कर्जत शहरामधील रस्त्यांवर मोकळा श्वास कधी घेणार ? ; स्वाक्षरी मोहिमेस उत्स्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

दिवसेंदिवस कर्जत शहरात वाहतुकीची तीव्र समस्या वाढत आहे, शहरातील मुख्य रस्त्यावरच अस्ताव्यस्तपणे उभ्या असलेल्या दुकानांच्या टप-या, हातगाड्या,रिक्षा यामुळे जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी, पादचारी यांना शहरातील रस्त्यांवरून चालण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असल्यामुळे नगरपरिषद प्रशासना विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे कर्जत विकास संघर्ष समितीने मी असह्य कर्जतकर स्वाक्षरी मोहिम राबविली त्यास कर्जतकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौकात स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती,याप्रसंगी कर्जत विकास संघर्ष समितीचे ड. कैलास मोरे, राजाभाऊ कोठारी, कृष्णा जाधव, विनोद पांडे, जयवंत म्हसे, प्रभाकर गंगावणे, शिवसेवक गुप्ता, अजय वर्धावे, मन्सुर बोहरी, मुकेश पाटील, अरविंद मोरे, मल्हारी माने, प्रशांत उगले, धनंजय दुर्गे, अमिर मनियार, निलेश हरिश्चंद्रे, सुमेश शेट्टये, किशोर तावरे आदी उपस्थित होते.

शहरातील वयोवृद्ध नागरिक, शालेय विद्यार्थ्यांना, पादचाऱ्यांना तसेच रेल्वे प्रवाशांना शहरातील रस्त्यांवरून फिरण्यासाठी होणा-या त्रासाची, संतापाची तीव्रता पाहुन कर्जत विकास संघर्ष समितीने कर्जत शहरामधील रस्त्यांवर मोकळा श्वास कधी घेणार ? ही मोहीम राबविल्याने जेष्ठ नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन आपल्या मनातील प्रशासना विरोधातील खदखद व्यक्त केल्याने शहरात चर्चेला उधाण आले. स्वाक्षरी मोहीम फलकावर अल्प-ावधीतच शेकडो स्वाक्ष-या झाल्याने शहरातील नागरिकांच्या मनातील तीव्रता दिसुन आली. सदर स्वाक्षरी मोहीमेस महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी यांनी भेट देऊन स्वाक्ष-या केल्या.



# केंद्र सरकारच्या कामगार विरोधी संप अनेक ठिकाणी बंद आणि मिरवणूक

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून ४ कामगार श्रम संहिता लागू करण्याचा निर्णय घेतला असून या विरोधात देशातील प्रमुख कामगार संघटनांनी २८ व २९ मार्च ला कामगारांचा संप जाहीर केला होता या निमित्ताने उरण मधील औद्योगिक क्षेत्रात संप पुकारला हता. या संपामध्ये सरकारी कर्मचारी,बँक, पोस्ट व वीज या विभागातील कर्मचाऱ्यांनी या संपात सहभागी झाले होते. या संपाच्या निमित्ताने सीआयटीयु या कामगार संघटनेने उरण शहरातून मिरवणूक करण्यात आली होती.

उरणच्या चारफाटा येथून ही कामगारांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कामगार विरोधी कामगार संहिता रद्द करा, खाजगीकरण रद्द करा,महागाई कमी करा,कामगार एकजुटीचा विजय असो,आदी घोषणा कामगारांनी देत चारफाटा,पालवी रुग्णालय,खिडकोळी नाका,जरी मरी मंदिर असा मोर्चा गांधी चौकात मोर्चा आल्या नंतर त्यामध्ये सभेसमोर,सीआयटीयु चे नेते कॉम्रेड भूषण पाटील,किसान नेते संजय ठाकूर,नगरपालिका नेते संतोष पवार भारतराज थळी यांनी भाषणे केली.

या संपात उरण तहसील मधील कर्मचारी सहभागी झाल्याने सम्पूर्ण कामकाज बंद होते. या संपात सर्व कर्मचारी सहभागी झाले असल्याची माहिती उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली.

यामध्ये वीज कामगारांनी सहभाग घेतला होता. तसेच उरण मधील राष्ट्रीय बँका मधील कर्मचारीही सहभागी झाले होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री.तुकाराम सिताराम पाटील यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजरहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** : तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : जुई येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं.५२, हिस्सा ३ यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर २८ आर ४० प्रति, व पोटखाबा ०० हेक्टर ०० आर ५९ प्रति, यांसी आकार रक्कम रुपये ०.०० पैसे यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

दि.२७ मार्च २०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे क्षेत्र त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल हे कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक / कब्जेदार यांनी आमचे अशिलाकडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा स्वीकारून लेखी करार केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**गाळा (दुकान) मिळकतींचे वर्णन**
**मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

| अनु | पत्ता | गाळा नं. | क्षेत्र | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | हॉगकॉग आर्केड युनिट नं.६५, प्लॉट नं.०४, रोड नं.१७, सेक्टर क्र.१९, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ | युनिट नं.६५ | १८६.५० चौ.फू | श्री.संतोकसिंग गुरुबचनसिंग छाब्रा |

तरी सदरहू गाळा मिळकतीवर व मोकळ्या जागेवर किंवा त्यांच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकत व तक्रार द्यावी. अशी हरकत व तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा कुणाचाही हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधानकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२८/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.विक्रम पी. राठोड**
**पत्ता : व्ही ॲण्ड एस लिगल असोशिएट, हरदेव निवास गाळा क्र.४, सेक्टर क्र.११, नवीन पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

# पोलादपूर नगरपंचायतीचे व्हॉल्व्हमधून होणाऱ्या पाणीगळतीकडे अक्षम्य दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या हद्दीतील रोहिदासनगर आंबेडकरनगरच्या रस्त्याच्या मध्यभागी एक व्हॉल्व्ह फुटल्यामुळे पुढील लोकवस्तीला पाणीपुरवठा होणे बंद झाले आहे तर फुटलेल्या व्हॉल्व्हमुळे रस्त्यामध्ये डबके तयार होऊन मोटारसायकलस्वारांसह दुचाकीस्वारांचे अपघात होत असल्याच्या घटना झाल्या आहेत. यासंदर्भात नगरसेवक निखिल कापडेकर यांनी लक्ष वेधले असूनही कोणतीही कार्यवाही नगरपंचायत प्रशासनाने न केल्याने पाणीगळती वेगाने होत आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या प्रभाग २ आणि प्रभाग ३ मधील रोहिदासनगर आंबेडकरनगरच्या रस्त्याच्या मध्यभागी श्रीदत्तमंदिराजवळ गेल्या काही दिवसांपासून एक व्हॉल्व्ह फुटल्यामुळे मोठया प्रमाणात पाणीगळती होत असून यामुळे याच नगरांच्या सावित्री नदी लगतच्या लोकवस्तीला नळपाणीपुरवठा होत नाही. या परिसरात चिखलाचे साम्राज्य होत असल्याने श्रीदत्तमंदिराजवळ व्हॉल्व्हभोवतीच्या खड्ड्यामध्ये याबाबत प्रभाग ३चे नगरसेवक निखिल कापडेकर यांनी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम करणाऱ्या एलॲण्डटी या ठेकेदार कंपनीला तसेच नगरपंचायत पोल-ादपूरला या समस्येवर तातडीने उपाययोजना करून व्हॉल्व्ह बदलण्यासंदर्भात पाठपुरावा केला. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून व्हॉल्व्हमधून मोठया प्रमाणात होणाऱ्या पाणीगळतीमुळे अपघात आणि पाणीपुरवठयातील अनियमितता कायम राहिली आहे.

पोलादपूर नगरपंचायतीचा रस्ता आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी या फुटलेल्या व्हॉल्व्हचे स्थान असल्याने एलॲण्डटी या ठेकेदार कंपनी हे काम करेल अशी अपेक्षा नगरपंचायत पोलादपूरच्या प्रशासनाने केली असून एलॲण्डटी या ठेकेदार कंपनीच्या कक्षेबाहेर रोहिदासनगर आंबेडकरनगरचा हा रस्ता असल्यामुळे हे काम नगरपंचायत पोलादपूरने करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, दोन्ही आस्थापनांच्या अक्षम्य दूर्लक्षामुळे ही पाणी गळती मोठया प्रमाणावर सुरूच राहिली आहे.

# ग्रामपंचायत विचुंबे

## ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर सूचना २०२१/२२

दि.२९/०३/२०२२

ग्रामपंचायत विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रामपंचायत विचुंबे हद्दीतील १५ वा वित्त आयोगांतर्गत पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | विचुंबे हनुमान नगर पाईप लाईन टाकणे | २२३४१३/- | २२३४/- | २९/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०७/०४/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २ | गणेश भिंगारकर ते अनंत गावंड यांचे घर पर्यंत आर.सी.सी.पाईप गटार बांधणे | २५००००/- | २५००/- | २९/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०७/०४/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ३ | सुंदराबाई घर ते प्राथमिक शाळेपर्यंत बंदिस्त गटार बांधणे | २५००००/- | २५००/- | २९/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०७/०४/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ४ | विचुंबे सुपर मार्केट ते विष्णू म्हात्रे घर रस्ता काँक्रीट करणे | १००००००/- | १००००/- | २९/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०७/०४/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ५ | विचुंबे अंतर्गत पाईप लाईनवर वॉल बसविणे. | ३०००००/- | ३०००/- | २९/०३/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०७/०४/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.२९/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.२९/०३/२०२२ ते ०७/०४/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२९/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.०७/०४/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत विचुंबे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१४) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१५) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.
१६) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१७) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१८) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
२०) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
२१) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# पनवेल महानगपालिका

## ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां.२२२१/११५३/२०२२ दिनांक : २४/०३/२०२२

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका/गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ५ | प्लॉट नं.७३७-ए गाळा नं.४, रंभा निवास, पनवेल | १) शिल्पा अविनाश महेश्वरी उर्फ शिल्पा रतनलाल लाहोटी २) श्वेता मुरारी मुदंडा उर्फ श्वेता रतनलाल लाहोटी ३) सपना शैलेश मणियार उर्फ सपना रतनलाल लाहोटी | श्री/श्रीमती.शितल मोतीलाल जैन (कटारिया) |
| २ | १३ | फा.प्लॉट नं.२९५, सदनिका क्र.ई-१०३ मयुरेश्वर सोसा, पनवेल | १.मे.हॅपी होम कन्स्ट्रक्शन २.श्री.केदार रमाकांत पाटील | श्री/श्रीमती.सर्वेश श्रीकृष्ण ठाकूर, शितल सर्वेश ठाकूर |
| ३ | ९ | सिटी एस क्र.९१२, अे/१५ व ९१३बी/२, सदनिका क्र.४, शनेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था, पनवेल | प्रवीण रामनाथ पाटील | रामचंद्र उम्मेदमल रावल |
| ४ | ७ | फा.प्लॉट नं.५१८ सदनिका क्र. १०२, साहिल पार्क सोसा.पनवेल | १.श्री./श्रीमती.कमरुन्निसा अ.सत्तार परकार २.लियाकत इसहाक परकार, बद्रुन्निसा लियाकत परकार | श्री/श्रीमती.अफिफा नाज अब्दुल अजीज पटेल, जुबेर मुजम्मिल पांडे |
| ५ | ५ | प्रॉ.क्र.५२३/१, ५२४/१, सदनिका क्र. सी-२, माणिकनगर सोसा, पनवेल | अनुराधा बाळकृष्ण वाडेकर | श्री/श्रीमती.सुवर्णा अभय जोशी, वर्षा श्रीधर गयावळ, सुमेधा विद्याधर भुरकुटे |
| ६ | ११ | सिटी सर्व्हे क्र.३७/६-७ (पी), ३९/१-२ (पी), ४६/ए, सदनिका क्र.बी-००३, रिद्धी सिद्धी सोसा, पनवेल | श्री/श्रीमती.राजश्री बिराजदार तर्फे वारस कु.अंकिता वेंकट बिराजदार, राजश्री बिराजदार तर्फे वारस कु. संकेता वेंकट बिराजदार | राजश्री वेंकट बिराजदार तर्फे वारस श्री.वेंकट केशव बिराजदार |
| ७ | १३ | फा.प्लॉट क्र.४०७-अे, सदनिका क्र.०११, श्री साई श्रद्धा सोसा, पनवेल | काजल परिमल सरकार | सुनिता राजेंद्र देसाई |
| ८ | ९ | फायनल प्लॉट नं.४६४, भूखंड क्र.४५, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल | श्री./श्रीमती.हेमांगी गिरीधर घरत कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल | श्री/श्रीमती राकेश भुंडराम चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेल |
| ९ | १३ | फायनल प्लॉट नं.४१९, ४२६/१ सदनिका क्र.सी-२, चैनल रेसिडेन्सी, पनवेल | श्री/श्रीमती.कौशिक चॅटर्जी | श्री/श्रीमती विशाल सिंह तोमर |
| १० | ९ | फायनल प्लॉट नं.४५८, ४९७, ४९८ सदनिका क्र.सी-२१, कल्पतरु रिव्हरसाईड, बिल्डींग नं.३, तक्का पनवेल | मे.कल्पतरु + शर्यन्स | सोनजूही शांन्ति बैद |
| ११ | ९ | फायनल प्लॉट नं.४५८, ४९७, ४९८ सदनिका क्र.सी-२३, कल्पतरु रिव्हरसाईड, बिल्डींग नं.३, तक्का पनवेल | मे.कल्पतरु + शर्यन्स | शांती कमल सिंग बैद वंदना शांती बैद |
| १२ | ९ | फायनल प्लॉट नं.२१२/२१३ ए, सदनिका क्र.ए-९ हाय पॉईंट सोसा.पनवेल | श्री/श्रीमती असलम ए.एम.मुन्शी | श्री/श्रीमती विजय जगन्नाथ बहिरा |
| १३ | ७ | सिटी सर्वे क्र.४२१ व ४२२ सदनिका क्र.०७, श्री साई पार्क सोसा.पनवेल | श्री/श्रीमती अमित मारुती खेरटकर | श्री/श्रीमती कविता राजू बेल्हेकर, राजू भाऊ बेल्हेकर |
| १४ | १ | सिटी सर्वे क्र.१०५/सी-१, सदनिका क्र.३०३, अल अफात नव्याने सुबेदार अपार्टमेंट, पनवेल | श्री/श्रीमती फराज बशीर पिठ्ठू | श्री/श्रीमती १.तशफीन नुरमहमद बोबलाई २.अरसलान नुरमहमद बोबलाई |
| १५ | १३ | फायनल प्लॉट नं.४०३, गाळा नं.२३, एन्के हेरिटेज सोसा, पनवेल | श्री/श्रीमती अनुजा अजय परिचारक | श्री/श्रीमती नुर अली जमील चौधरी |
| १६ | १४ | फायनल प्लॉट नं.२९/४, सदनिका क्र. ए-४०३, निळकंठ धाम, पनवेल | श्री/श्रीमती रुपा असोसिएट तर्फे भागीदार १) राजेंद्र सहेजराम जेसवाणी २) जयेश पी सोनेता ३) जिग्नेश पी.माहेश्वरी | श्री/श्रीमती १) प्रज्ञा राजेश जोशी २) चिराग राजेश जोशी |
| १७ | १० | सिटी सर्वे क्र.१३६९ बी, सदनिका क्र. बी-७, ऐश्वर्या सोसा, पनवेल | श्री/श्रीमती भाऊ नारायण पाटील | श्री/श्रीमती अभिजीत भाऊ पाटील |
| १८ | ९ | फायनल प्लॉट नं.४५८, ४९७, ४९८ सदनिका क्र.ए-५२, कल्पतरु रिव्हरसाईड, बिल्डींग नं.४ ए, तक्का पनवेल | मे.कल्पतरु + शर्यन्स | श्री/श्रीमती लक्ष्मी एस नायर यांचे वतीने कु.मु.म्हणून हरिदास |
| १९ | १४ | सर्वे क्र.४८३ व ४८४ सदनिका क्र.०६०२, महावीर वाटीका सोसा, पनवेल | १)मे.सुपर कंन्स्ट्रक्शन कंपनी २) मे. अभिषेक इंटरप्रायझेस ३) श्री/श्रीमती गणेश बी अपराज, अनुराधा गणेश अपराज | श्री/श्रीमती तेहसिन मन्सुर काझी, काझी मन्सुर शेख हुसैन |
| २० | १० | सिटी सर्वे क्र.१२७१/१ ते १२७१/१०, १२७१/ए १२७१/बी व १३३८ सदनिका क्र.६०४, रचना हाईटस, पनवेल | श्री/श्रीमती विपुल देवचंद शाहमल, देवचंद भवनजी शहामल | श्री/श्रीमती धीरज माधव पाटल, स्वाती धीरज पाटील, माधव गोपाळ पाटील, सरला माधव पाटील |
| २१ | १० | सिटी सर्वे क्र.१५६०/ए, सदनिका क्र.१३ सागर अपार्टमेंट, द्वारका सोसा., पनवेल | श्री/श्रीमती सायली मुकूंद गोठणकर उर्फ सायली मनिष जोशी | श्री/श्रीमती सौरभ मुकूंद गोठणकर |
| २२ | ६ | सिटी सर्वे क्र.५५१-बी, गाळा नं.०१, अंबिका आर्केड सोसा, पनवेल | श्री/श्रीमती मे अंबिका लपर्स डेव्हलपर्स तर्फे भागीदार कल्पेश जसुभाई पटेल | श्री/श्रीमती संजय किसन शेट्ये |
| २३ | ८ | फायनल प्लॉट नं.२३०/१ सदनिका क्र.३०२, साई स्नेह सोसा, पनवेल | श्री/श्रीमती राकेशकुमार चंदनाल बाफना | श्री/श्रीमती सुशिल चंदनाल बाफना, रिना सुशिल बाफना |
| २४ | ११ | फायनल प्लॉट नं.५०, सदनिका क्र.अे३, गंबा बिल्डींग, पनवेल | श्री/श्रीमती निता महेश्वर सिंह | श्री/श्रीमती सरोज जयपालसिंह ठाकूर |
| २५ | १० | सिटी सर्वे क्र.१५६० सदनिका क्र.८, सागर अपाटमेंट, द्वारका सोसा, पनवेल | श्री/श्रीमती सायली मुकूंद गोठणकर उर्फ सायली मनिष जोशी | श्री/श्रीमती सौरभ मुकूंद गोठणकर |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

**सही/-**
**(सुनिल मानकामे)**
**सहा.आयुक्त**
**मालमत्ता कर विग**
**पनवेल महानगरपालिका**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३६२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२९ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पेण विद्युत मंडळाचे कर्मचारी दोन दिवसांच्या संपावर

**दै.रायगड नगरी । पेण**

महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या तीन वीज कंपनीतील २७ संघटनांचे कर्मचारी आजपासून (२८ मार्च ते २९ मार्च ) दोन दिवसांच्या देशव्यापी संपावर गेले आहेत. रायगड जिल्ह्यातील पेण विद्युत मंडळाचे देखील सर्व कर्मचारी या देशव्यापी संपात सामील झाले आहेत. वीज कर्मचाऱ्यांच्या या संपामुळे भर उन्हाच्या झळा सोसत अनेक ग्राहकांना या संपाचा शॉक सहन करावा लागत आहे.

महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या तिन्ही वीज कंपन्यांमधील विज कर्मचारी, अभियंते, अधिकारी, कंत्राटी कर्मचारी यांनी या संपात सहभाग घेतला आहे. कंपन्यांत सुरू असणारे खाजगीकरण रद्द करावे, विद्युत (संशोधन) बिल २०२१ हा केंद्र सरकारचा धोरण रद्द करावा, कंत्राटी व आउटसोर्सिंग कामगारांना वयाच्या ६० वर्षापर्यंत नोकरीत संरक्षण देण्यात यावे, महानिर्मिती कंपनीच्या अधिकार क्षेत्रातील जलविद्युत केंद्रे खाजगी उद्योजकांना देऊ नये, तिन्ही कंपन्यांमधील रिक्त पदे भरण्यात यावी, कर्मचारी अभियंता व अधिकाऱ्यांच्या बदली धोरणावर एकतर्फी निर्णय होऊ नये, वरिष्ठ पदावरील अनावश्यक भरती, बदल्या यांमध्ये राजकीय हस्तक्षेप होऊ नये आदी मागण्यांसाठी हे देशव्यापी संप दोन दिवस सुरू राहणार असून या दोन दिवसात कोणतीही विद्युत मंडळाची कामे या संपातील कर्मचारी करणार नाहीत असे कार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांनी सांगितले. यावेळी संघटनेच्या एकजुटीच्या घोषणा देखील देण्यात आल्या.



## नागोठण्याजवळ अपघातात तरूणाचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे-पोयानाड मार्गावर आंबेघर-वेलशेत गावच्या हद्दीत रविवारी दि. २७ मार्च रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दुचाकीला झालेल्या अपघातात जांभूळटेप येथील करण सीताराम भोईर (वय २३) याचा जागीच मृत्यू झाला. तर मोटारसायकलच्या मागे बसलेला तरुण गंभीर जखमी झाला आहे.

करण भोईर याचे अवघ्या २३ व्या वर्षी झालेल्या अपघाती निधनाने शीहू, बेणसे परिसरात शोकाकुल वातावरण असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार जांभूळटेप, पो. बेणसे येथील करण भोईर व त्याचा चुलत भाऊ हर्षल भोईर हे आपल्या ताब्यातील केटीएम कंपनीची ड्यूक मोटरसायकल घेऊन नागोठणे-पोयानाड मार्गावरून जात असताना वेलशेत-आंबेघर गावच्या हद्दीत आले असता करण याचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी रस्त्याच्या खाली उतरल्याने हा अपघात झाला. या अपघातात करण याच्या डोक्याला जबर मार बसल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर हर्षल भोईर हा जखमी झाला आहे. याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदर जे. पी. म्हात्रे करीत आहेत.

## डिझेलची चोरी करणाऱ्यांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील गव्हाण फाटा परिसरात उभे असलेल्या वाहनांमधून डिझेलची चोरी करणार्या दोघा जणांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गव्हाण फाटा परिसरात असलेल्या कंपन्यांच्या साईटमध्ये उभ्या असलेल्या वाहनांच्या टाकीचे झाकण तोडून बेकायदेशीररित्या डिझेलची चोरी होत असल्याची माहिती वपोनि विजय कादबाने यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो.नि.महादेव दळवी, पो.हवा. नितीन वाघमारे, अविनाश गथंडे, महेश पाटील, अशोक राठोड, भगवान साळुंखे, संतोष मिसाळ आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून आरोपी अहमद अब्दुल रहीम सय्यद (२९) व त्याचा सहकारी अशोक म्हस्के (२६) यांना जवळपास ३७ हजार रुपये किंमतीच्या चोरीच्या डिझेलसह ताब्यात घेतले आहे.

---

राव साहेब

**ॲड.सचिन केणी**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.येथील कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.४१५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०५/२०२२

ज्यापेक्षा कै.सुरेशकुमार सुरतसिंग दाहिया, रा.सदनिका क्र.१०३, सुरज कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.२/२१, सेक्टर ३६, कामोठे, पनवेल, रायगड हे दि.२० माहे जानेवारी सन २०२२ रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. सदर अर्जदार **१) श्री.विजयकुमार सुरेशकुमार दाहिया** वय २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी, **२) कुमारी.मानसी सुरेशकुमार दाहिया** वय २२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण, **३) श्रीमती.कमलेश सुरेशकुमार दाहिया** वय ५२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी उपरोक्त सर्व राहणार : सदनिका क्र.१०३, सुरज कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२/२१, सेक्टर ३६, कामोठे, पनवेल, रायगड या कोर्टास सदरहू मयत कै. सुरेशकुमार सुरतसिंग दाहिया यांचे नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत :

**मिळकतीचे वर्णन / सदनिकेचे वर्णन**

**सदनिका क्र.१०३, सुरज कॉम्प्लेक्स प्लॉट क्र.२५/२, सेक्टर ३६, कामोठे फेज-२, पनवेल, रायगड, क्षेत्रफळ : बिल्टअप एरिया ४०.१५ चौ.मी. + टेरेस २.२५ चो.मी.**

संबंधित सदर मयतांचे वारस असल्याबाबत सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कै.सुरेशकुमार सुरतसिंग दाहिया यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देईल.

२८ तारीख माहे मार्च सन २०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**ॲड.अरविंद एन. चामले**
**ॲड.शुभांगी पाटील**

### जाहीर नोटीस

खालापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो, खालापूर यांचे न्यायालयात

चौ.अर्ज नं.३२/२०२२

**१) अमित अनंत भोईर**
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.२ बी/१०१, १ ला मजला, निलपार्क,
प्लॉट नं.९४/३/४/५/६/७, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**२) निर्मला बाळाराम भगत**
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.११, गुरुकृपा सोसायटी, सावरकर चौक,
हनुमान मंदिर जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**३) श्री.अतुल अनंत भोईर**
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.२ बी/१०४, १ ला मजला, निलपार्क,
प्लॉट नं.९४/३/४/५/६/७, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**४) संगीता राजेंद्र पाटील**
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.अे-१०२, निलेटा गार्डन, स्वामी नारायण मार्ग,
बावन बंगल्याजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**५) पुनम जयदीप पाटील**
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणाी
रा.फ्लॅट नं.००१, रिद्धी रोझ समोर, सुशिल गार्डन,
ठाणा नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

प्रस्तुत अर्जदार यांचे वडील कै.अनंत पांडुरंग भोईर हे दि.८/११/२०२० रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे व्यवसायाचा परवाना होता व त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कलोते मोकाशी, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**
**महाराष्ट्र शासनाने** (F.L.III 97/2020-2021) **चे हॉटेल**
**अनंत भुवन (हॉटेल पुनम)** (F.L.III) **अनुज्ञप्ती क्र.९७,**
**कलोते मोकाशी, ता.खालापूर, जि.रायगड**

मयत कै.अनंत पांडुरंग भोईर यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | अमित अनंत भोईर | ३६ | मुलगा |
| २ | निर्मला बळीराम भगत | ५२ | मुलगी |
| ३ | अतुल अनंत भोईर | ४२ | मुलगी |
| ४ | संगीता राजेंद्र पाटील | ४७ | मुलगी |
| ५ | पुनम जयदीप पाटील | ३९ | मुलगी |

वरीलप्रमाणे मयत कै.अनंत पांडुरंग भोईर यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.२८/०३/२०२२
ठिकाण : खालापूर

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, खालापूर**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, खालापूर**

---

राव साहेब

प्रो.जमा.२-२५

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.प्रवीण बा. म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.२१९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२२

१) श्रीमती.आशरफी देवी ननकी उर्फ नानकी पासवान
वय : ७७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्रीमती.प्रेमशिला देवी रामानंद पासवान
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) श्री.रोशन रामानंद पासवान
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.राहूल रामानंद पासवान
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
क्र.१ ते ४ रा.अफलातून बिल्डींग, अे-विंग,
पहिला मजला, फ्लॅट क्र.१०२, उरण करंजा रोड,
पालवी हॉस्पिटल जवळ, उरण, ता.उरण,
जि.रायगड, पिन-४००७०२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान यांचे निधन दि.०५/०९/२०२० रोजी मु.पारस हमरी हॉस्पिटल, राजा बाजार, बेली रोड, पटना सदार, पटना, बिहार-८०००१४ येथे झाले आहे. कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान प्रो.प्रा.''रेश्मा इंजिनिअरस इंडिया यांचे नावे खालील वर्णनाची सदरहू मिळकत होती व आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.१)**

COMPANY NAME : TATA HITACHI.
DEALER NAME : Total Earthmovers Pvt. Ltd
Hypo With - KOTAK MAHINDRA BANK LTD.
MODEL NO-Hydraulic Excavator Model EX200 LC Super Bckhoe with GP Bkt & Kit
CUSTOMER CODE : 11853.
GST IN-(Maharashtra-27) 27AFJPP9726J1ZR
INVOICE NO-PNV2018EQU0177.
INVOICE DATE-08/02/2018
MSN NO-S200-24701.

येणेप्रमाणे कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान यांची स्वतःची टाटा हिताची कंपनीची पोखरण मिळकत असून सदर मिळकतीस यापुढे सोयीकरिता ''सदरहू मिळकत क्र.१'' असे संबोधण्यात येईल.

सदरहू मिळकत क्र.१ टाटा हिताची या कंपनीची पोखरण ही दि.०८/०२/२०१८ रोजी खरेदी केली होती. तसा टॅक्स इनवाईस (TAX INVOICE) दिनांक ०८/०२/२०१८ रोजीची आहे.

**मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.२)**

COMPANY NAME : TATA HITACHI.
DEALER NAME : Total Earthmovers Pvt. Ltd
Hypo With - KOTAK MAHINDRA BANK LTD.
MODEL NO- ALICON B230 ROCK BREAKER
CUSTOMER CODE : 11853.
GST IN-(Maharashtra-27) 27AFJPP9726J1ZR
INVOICE NO-PNV2018SPA1076
INVOICE DATE-09/02/2018
RB NO-B230-1396

येणेप्रमाणे कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान यांची स्वतःची टाटा हिताची कंपनीची रॉक ब्रेकर मिळकत असून सदर मिळकतीस यापुढे सोयीकरिता ''सदरहू मिळकत क्र.२'' असे संबोधण्यात येईल.

सदरहू मिळकत क्र.२ टाटा हिताची या कंपनीची रॉक ब्रेकर ही दि.०९/०२/२०१८ रोजी खरेदी केली होती. तसा टॅक्स इनवाईस (TAX INVOICE) दिनांक ०९/०२/२०१८ रोजीची आहे.

**मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.३)**

| कंपनी | मॉडेल | गाडी क्रमांक | चेसीस क्रमांक | इंजिन क्रमांक | कलर | व्हेईकल क्लास |
|---|---|---|---|---|---|---|
| महिंद्रा Rise | MAHINDRA SCORPIO S11MH 2 W 140 | MH 46 BE 1595 | MA1TA2WR 2H2K43619 | WRH4K 22723 | PEARL White | MOTOR CAR-NT |

येणेप्रमाणे कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान यांची स्वतःची महिंद्रा Rise कंपनीची स्कॉर्पिओ गाडी मिळकत असून सदर मिळकतीस यापुढे सोयीकरिता ''सदरहू मिळकत क्र.३'' असे संबोधण्यात येईल.

कै.रामानंद ननकी उर्फ नानकी पासवान यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

